## चॅप्टर ऑफ कॉस्ट अकौंटंट शाखाध्यक्षपदी आर. पी. गोरे



औरंगाबाद, ता. ८ : औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकौंटंट्स या आयसीडब्ल्यूए, कोलकत्ताच्या स्थानिक शाखा अध्यक्षपदी आर. पी. गोरे यांची २००७-२००८ या वर्षासाठी निवड करण्यात आली आहे. अध्यक्ष राजेश शुक्ला हे बडोदा येथे स्थलांतरित झाल्यामुळे घेण्यात आलेल्या विशेष बैठकीत गोरे यांची एकमताने निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारिणी अशी : उपाध्यक्ष - एस. पी. बंगाळे आणि डी. व्ही. डबरी, सचिव - बिश्वेस्वर सेन, कोषाध्यक्ष - एस. बी. मुंदाडे, सहसचिव - शिशिर भालचंद्र.

## आयसीडब्ल्यूए फाउंडेशन परीक्षेचा निकाल जाहीर

औरंगाबाद, ता. ८ : जून २००७ मध्ये झालेल्या आयसीडब्ल्यूए फाउंडेशन परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, चाळीस टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. परीक्षेत विशाल नावंदर आणि श्रेयस चौधरी हे विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाले. औरंगाबाद चॅप्टरचे अध्यक्ष आर. पी. गोरे आणि प्रशिक्षण समितीचे अध्यक्ष ए. आर. जोशी तसेच कार्यकारिणी सदस्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांनी संस्थेच्या त्रिमूर्ती चौक, जवाहर कॉलनीतील कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

D. SAKAL
9.8.2007